Seat No.: | | | | | | |

Sl. No. : 102671

# 003(M)

**(March, 2020)**

***Time : 3 Hours]*** ***[Maximum Marks : 100***

सूचना :

1) या प्रश्नपत्रिकेचे पाच विभाग करण्यात आलेले आहेत.
2) प्रश्नांचे विकल्प आंतरिक आहेत.
3) उजवीकडील अंक गुण दर्शवितात.
4) लेखनसज्जता, भाषाशुद्धी आणि मौलिक लिखाणास गुण प्राधान्य असेल.

## विभाग - A
### ( पद्य )

■ **खालील प्रश्नांची हेतुलक्षी उत्तरे लिहा :** [ 4 ]

1) 'भज भज भवजलधिमाजि' या काव्याचा साहित्य प्रकार कोणता?
2) मराठीतील आधुनिक कवी म्हणून कोण ओळखले जातात?
3) सतीश काळसेकरांनी कोणत्या कवितेचे लेखन केले आहे?
4) 'कवितेविषयी एक पत्र' या कवितेचे कवी कोण आहेत

■ **खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा :** [ 4 ]

5) श्वानाने कोणत्या रंगाचा वेष धारण केला आहे, असे तुकाराम म्हणतात?
6) शंकर कोण आहे, असे कवी रामजोशी म्हणतात?
7) 'एक प्रकारची प्रार्थना' या कवितेत कवी कोणत्या ग्रहासाठी प्रार्थना करीत आहे?
8) ग्रहावरचे हे लोक कसे आहेत?

■ **खालील प्रश्नांची दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा :** [ 4 ]

9) 'गोफण' हे रूपक कवितेत कशासाठी वापरले आहे?
10) कवी यशवंत यांची खरी कमाई कोणती?

■ खालील कोणत्याही दोन प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा : [8]

11) नलराजाने राजहंसाला धरल्यानंतर राजहंसाने सुटण्यासाठी काय काय प्रयत्न केले, ते तुमच्या शब्दांत लिहा.

12) खालील काव्यपंक्तीचा भावार्थ स्पष्ट करा :

'आज गोरे नाहीत, ती स्वप्नांतली राज्ये नाहीत,
आमच्या दाट डोक्यांगत अरण्ये नाहीत, तू नाहीस,
आहे फक्त अरण्यात वाढणारा असंतोष.'

13) 'मनाचा दगड' या कवितेत कवीला दिवसांचे ओझे का वाटत आहे?

## विभाग -B

### ( गद्य )

■ खालील प्रश्नांची हेतुलक्षी उत्तरे लिहा : [4]

14) केशिराज बास यांनी किती दृष्टांतांना जोडून 'दृष्टांतपाठ' तयार केला आहे?

15) 'गुलामगिरी', 'शेतकऱ्याचा असूड' या ग्रंथांचे लेखक कोण आहेत?

16) वसंत कानेटकरांनी लिहिलेल्या संगीत नाटकाचे नाव काय होते?

17) 'चंद्रगुप्ताची अंगठी' या पाठाचा साहित्य प्रकार कोणता?

■ खालील प्रश्नांची प्रत्येकी एका वाक्यात उत्तरे लिहा : [4]

18) नरेन्द्रचा कल कुठे होता?

19) आबाच्या शेतात कशाचे पीक असे?

20) विनोबाजींनी बाबांना किती पैसे दिले?

21) आईच्या चेहऱ्यावर कायम काय असे?

■ खालील प्रश्नांची प्रत्येकी दोन-तीन वाक्यांत उत्तरे लिहा : [4]

22) उन्मत हत्तीच्या मागे कोण-कोण धावले? हत्तीला आटोक्यात आणण्यासाठी त्यांनी काय-काय केले?

23) खिरापत कशी ओळखली जाते?

■ **खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा [ कोणतेही दोन ] :** [ 8 ]

24) 'कलिंगड' या कथेत अनाथालयात गेल्यावर कथा निवेदकाला कोणकोणत्या अनुभवांतून जावे लागले?

25) हरिदासांनी निवृत्तीनंतरची कोणती स्वप्ने पाहिली होती, ते तुमच्या शब्दांत लिहा.

26) 'लाल चिखल' या पाठाच्या शीर्षकाची समर्पकता पटवा.

## विभाग - C
## ( व्याकरण )

■ **खालील वाक्यांचा पदक्रम योग्य क्रमात जुळवून वाक्ये पुन्हा लिहा :** [ 2 ]

27) चंद्रभागेचे सुंदर आमचे आहे फार वाळवंट.

28) पूजा हत्तीची आणि करायची म्हणायची गाणी.

■ **खालील समानार्थी शब्दांच्या जोड्या शोधून पुन्हा लिहा :** [ 2 ]

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 29) | घर | – | मुख | – | दौलत |
| 30) | संपत्ती | – | पंकज | – | वदन |
| 31) | कमल | – | सदन | – | पद्म |
| 32) | तोंड | – | धन | – | निवास |

■ **खालील विरुद्धार्थी शब्दांच्या जोड्या शोधून पुन्हा लिहा :** [ 2 ]

| | | | |
|---|---|---|---|
| 33) | स्वार्थ | × | पराजय |
| 34) | संघटन | × | परमार्थ |
| 35) | प्रकाश | × | विघटन |
| 36) | विजय | × | अंधार |

■ **खालील शब्दसमूहांसाठी प्रत्येकी एक शब्द द्या :** [ 2 ]

37) असहाय वृद्धांना राहण्यासाठी सोय.

38) साळीच्या धान्याचा ढीग.

39) वाटसरूंसाठी पाणी पिण्याची सोय.

40) ज्याच्याकडे शस्त्र नाही, असा.

■ **खालील वाक्याचे कंसांतील सूचनेनुसार वाक्यात रूपांतर करा :** [1]

41) आमचा आरुष दिसायला किती सुंदर!

(विधानार्थी वाक्य करा)

■ **खालील वाक्यांचे कंसांतील सूचनेनुसार वाक्यात परिवर्तन करा :** [1]

42) मी तुम्हांला अर्धीच गोष्ट सांगतो, तुम्ही ती गोष्ट पूर्ण करा.

(संयुक्त वाक्य करा)

■ **खालील सामासिक शब्दाचा विग्रह करून समासाचा प्रकार सांगा :** [1]

43) वीरपुरुष

■ **खालील अलंकाराचे उदाहरण द्या :** [1]

44) श्लेष

■ **खालील वृत्ताचे उदाहरण देऊन लक्षणे सांगा :** [1]

45) लहान अभंग

■ **खालील वाक्यातील प्रयोग ओळखा :** [1]

46) स्वरा नृत्य करीत होती.

■ **खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगा :** [1]

47) पंचाईत होणे

48) डोळा लागणे

■ **खालील ग्रामीण शब्दांना प्रचलित मराठी शब्द द्या :** [1]

49) डकुयात

50) इस पैसा

■ खालील अशुद्ध शब्द शुद्ध करून लिहा : [1]

51) निरमल

52) समरपन

■ खाली दिलेल्या शब्दांमधील अर्थभेद लिहा : [1]

53) ग्रह - गृह

■ खालील म्हणींचा अर्थ सांगा : [1]

54) उद्योगाचे घरी रिद्धी-सिद्धी पाणी भरी.

55) कर नाही त्याला डर कशाला?

■ खालील वाक्यात विरामचिन्हांचा वापर करून वाक्य पुन्हा लिहा : [1]

56) मित्र म्हणाला बरोबर उठवतो तू काळजीच सोड.

## विभाग - D
## ( अर्थग्रहण )

■ खालील कविता वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा : [5]

तिन्ही लोक आनंदाने भरून जाऊ दे रे
तुझे गीत गाण्यासाठी सूर लावू दे रे ॥धृ॥

शुभ्र फुले माळून आल्या निळ्या निळ्या लाटा
रानफुले लेऊनि सजल्या या हिरव्या वाटा
या सुंदर यात्रेसाठी मला जाऊ दे रे ॥१॥

मोर केशरांचे झुलती पहाटेस दारी
झऱ्यातुनी दिडदा दिडदा वाजती सतारी
सोहळ्यात सौंदर्याच्या तुला पाहू दे रे ॥२॥

शांत शांत उत्तररात्री मंद मंद तारे
तुझे प्रेम घेऊनि येती गंध धुंद वारे
चांदण्यात आनंदाच्या मला न्हाऊ दे रे ॥३॥

एक एक नक्षत्राचा दिवा लागताना
आणि फुले होण्यासाठी कळ्या जागताना
पौर्णिमा स्वरांची माझ्या तुला वाहू दे रे ॥४॥

— मंगेश पाडगावकर

प्रश्न :

57) शुभ्र फुले माळून कोण आले आहे?

58) झऱ्यातून कशाचा आवाज येत आहे?

59) गंध धुंद वारे काय घेऊन येतात?

60) केशरांचे मोर केव्हा झुलतात?

61) कवितेला योग्य शीर्षक द्या.

■ **खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा :** [5]

चार माणसे शेजारीपाजारी, पारावर, शाळेत, कचेरीत, बसमध्ये, आगगाडीच्या डब्यात या ना त्या निमित्ताने थोडा वेळ जरी एकत्र जमली, की त्यांच्या बोलण्याचा, गप्पांचा आणि चर्चेचा विषय असतो इतरांच्या चुका, इतरांचे दोष व इतरांची टवाळी ! म्हणजे ही एक प्रकारची परनिंदाच चाललेली असते असे म्हणा ना ! मद्याची नशा चढावी त्याप्रमाणे परनिंदेची धुंदी माणसास चढत असते. परनिंदा करणारा माणूस स्वत:च्या अंत:करणातील आणि सभोवतालच्या वातावरणातील प्रसन्नता नाहीशी करून सर्वत्र दु:खाचे, औदासिन्याचे, निराशेचे, मत्सराचे आणि द्वेषाचे वातावरण निर्माण करण्यास हातभार लावत असतो. धूर ओकणाऱ्या ज्योतीमुळे दिव्याची काच धुरकटून जाते आणि दिव्याचा प्रकाश पार हरपून जातो. मात्र ज्योतीची काजळी झटकली, ती मर्यादित ठेवली व दिव्यावरील काच रोज सकाळी वा संध्याकाळी स्वच्छ पुसली, की प्रकाश अवतीभवती लख्ख पसरतो व वातावरण उजळून निघते. आपण रात्री झोपण्यापूर्वी किंवा पहाटे उठण्यापूर्वी मनाच्या काचेवर सतत इतरांच्या अवगुणांच्या विचाराने जमलेली काजळी अंत:करणातील क्षमेच्या राखेने स्वच्छ पुसली, की आपले मन दिवसभर टवटवीत राहते. जेथे जेथे आपण जाऊ तेथे तेथे प्रसन्नताच निर्माण करण्यास आपला हातभार लागेल.

प्रश्न :

62) माणसास कोणती धुंदी चढते, असे लेखक म्हणतात?

63) सभोवतालच्या वातावरणातील प्रसन्नता कोण नाहीशी करतो?

64) मनावरची काजळी कशी स्वच्छ करता येते?

65) धूर ओकणाऱ्या ज्योतीमुळे दिव्याच्या काचेचे काय होते?

66) उताऱ्यास योग्य शीर्षक द्या.

■ **खालील उताऱ्याचा $1/3$ भागात सारांश लिहा व उताऱ्यास योग्य शीर्षक द्या :** [5]

67) आपण जेथे पाहू तेथे परमेश्वरच आहे, परंतु आपण आंधळे आहोत. आपण झाडामाडातच देव पाहतो, परंतु मानवातील देव आपणांस दिसत नाही. आपणांस चार तोंडांचा, आठ हातांचा असा देव पाहिजे असतो. मनुष्याहून काही निराळा देव आपणांस हवा असतो. मनुष्याच्या रूपाने आपल्या शेजारी उभा असलेला परमेश्वर आपणांस दिसत नाही. या मानवाजवळ आपण भांडतो, त्याला आपण गुलाम करतो, त्याची कत्तल करतो आणि देवाची पूजा करू पाहतो. भगवंताला याचे आश्चर्य वाटते. अरे, मनुष्यातील देव आधी पाहा. हा बोलता-चालता देव आहे. याचे स्वरूप बघा, याला काय हवे-नको ते पाहा. दगडाच्या देवाला काय आवडते, हेही आपण ठरवून टाकले आहे. गणपतीला मोदक आवडतो, विठोबाला लोणी आवडते, खंडोबाला खोबरे हवे; परंतु मानवाला काय हवे, याची विवंचना आपण कधी करतो काय? आपल्या सभोवती हा दोन हातांचा देव उभा आहे. त्याच्या पोटात अन्न नाही, त्याच्या अंगावर वस्त्र नाही. त्याच्या पूजेला जातो का धावून?

■ **खालील परिच्छेद काळजीपूर्वक वाचून तो कालक्रमानुसार लिहा :** [5]

68) रंगांच्या आणि आकारांच्या सुंदर मेळातून ते चित्र कागदावरून उचलल्यासारखं वाटे. निळ्या रंगातले हत्ती, पिवळ्या फुलांच्या माळा सोंडेत घेऊन समोरासमोर उभे असत. तात्या त्या चित्राचा कागद गणपतीच्या कोनाड्याजवळ चिकटवत. चित्राच्या कडेनं गुलबक्षी रंगाच्या नाजूक फुलांची नक्षीदार चौकट असे. चित्राच्या दोन्ही बाजूंना भिंतीत खिळे ठोकत. तात्यांनी हादग्याच्या चित्राचा कागद शिवलाल उगरलाल यांच्या दुकानातून कधीच आणून ठेवलेला असे.

## विभाग - E
### ( लेखन )

69) तुमच्या शाळेचा 'वार्षिक उत्सव' याविषयी अहवाल लेखन करा. [5]

■ **खालील दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे सुमारे 100 शब्दांत गोष्ट तयार करा व त्यास योग्य ते शीर्षक द्या.** [5]

70) एका गृहस्थाची अंगठी चोरली गेली — नोकराचा संशय — त्याच्याकडून नकार — न्यायालयात प्रकरण — न्यायाधीशांची युक्ती — समान लांबीच्या काठ्या सर्वांना दिल्या — चोराची काठी — एक इंच वाढेल — खऱ्या चोराने एक इंच काठी कापली — दुसऱ्या दिवशी न्यायाधीशांचा निर्णय.

**किंवा**

■ **खालील कल्पनेचा सुमारे 100 शब्दांत विस्तार करा.**

'जया अंगी मोठेपण तया यातना कठीण'.

■ **खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे 250 शब्दांत निबंध लिहा.** [10]

71) कुटुंब व्यवस्थेतील वृद्धांचे स्थान -

रूपरेखा — सगळ्यांना भेडसावणारा प्रश्न — वृद्धाश्रमांचे महत्त्व वाढणे — तरुण पिढी आणि वृद्ध यांच्यांत मतभेद — स्वतंत्र कुटुंबपद्धती — जागेचा अभाव — वृद्धांचा हेकेखोरपणा — घराची काळजी — संस्कार — बालकांना धार्मिक ज्ञान —तरुणांशी जुळवून घेतल्यास योग्य स्थान.

**किंवा**

प्रदूषण एक समस्या -

रूपरेखा — आधुनिक काळात वाढते प्रदूषण — वाढणारे आजार — कारखाने, उद्योग, धंदे — वाहनांची संख्या — बंदी — शिस्त — थांबविण्यासाठी उपाय-योजना — वृक्षारोपण — वनांची लागवड — वाढणारी गरज इ.

**किंवा**

करमणुकीच्या साधनांवर बंदी आणली तर ...... -

रूपरेखा — मनोरंजन, मौजमजा, हल्लागुल्ला — त्यामुळे करमणुकीच्या साधनांची रेलचेल — बंदी आली तर ..... ! — चोरून करण्याची प्रवृत्ती वाढते — लोक बेकार होतील — परिणाम — कंटाळलेपणा — हिंसक बनेल — मोठा धोका निर्माण होईल — फायदे व तोटे दोन्हीही दिसतील.

◆◆◆